Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ९] बुधवार, फेब्रुवारी ११, २०२६/माघ २२, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२०.

महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

सूचना

क्रमांक मं.वि.यो.-नामप्रविप्रा-सूचना-कलम ३७-१२९१-२०२५.—

ज्याअर्थी, नागपूर महानगर प्रदेशाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४१६-प्र.क्र.-१२२(अ)-२०१६-नवि-९, दिनांक ०५ जानेवारी, २०१८ अन्वये भागशः मंजूर झालेली असून, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, उर्वरित भागाची विकास योजना (EP/Excluding Part) शासन निर्णय क्रमांक टिपीएस-२४१६-प्र.क्र.-१२२(ब)-ई.पी.-२०१६-नवि-९, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये मंजूर झालेली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेत मौजा कापसी (बु.), तह. कामठी, जि. नागपूर येथील खसरा क्र. ८०/२, ८०/३ या जागा अर्बन सेक्टर East-A मध्ये "East A- PG015 (Play Ground)" या आरक्षणाकरीता प्रस्तावित आहे. (यापुढे " उक्त जागा " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेमधील १.२२ हे. आर क्षेत्रावरील "East A- PG015 (Play Ground)" चे आरक्षण वगळून " औद्योगिक " या प्रस्तावित वापराकरीता अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे. सदर क्षेत्राकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहे व यासाठी ठराव क्र. ०५/०३/११/२०२५ अन्वये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे ;

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा उक्त विकास योजनेचा भाग नकाशा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, स्टेशन रोड, सदर, नागपूर-४४०००१ या कार्यालयात कामकाजाच्या सर्व दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या निरिक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तसेच सदर अधिसूचना प्राधिकरणाच्या **www.nmrda.org** या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की.

ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त होतील, त्यावर नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरणाकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा उक्त प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यात येईल.

संजय मीणा,
महानगर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नागपूर.

नागपूर :
दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२१.

BY METROPOLITAN COMMISSIONER, NAGPUR METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

Modification Under Section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

NOTICE

No. D. P. (NMRDA)-Notification-Sec.37- 1291-2026.—

Whereas, the Development Plan of Nagpur Metropolitan Region Development Authority has been partially sanctioned by the Government *vide* Urban Development Department Notification No. TPS-2416-CR-122(a)-2016-UD-9, Dated 05th January, 2018 and came into force from 9th February, 2018. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2416-CR-122(b)-EP-2016-UD-9, Dated 21st February, 2019. (hereinafter referred to as "said Development Plan");

And whereas, in the Sanctioned Development Plan the said land of, Mauja Kapsi , Tah. Kamptee, Khasra No.80/2 & 80/3 area admeasuring 1.22 Ha. is included in East-A Sector and reserved for "East A -PG015 (Play ground)" (hereinafter referred to as "said Land");

And whereas, as per Section 37*(1)*of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Nagpur Metropolitan Region Development Authority has decided to exclued the part of said land area admeasuring 1 .22 Ha from the said reservation and to be included in "Industrial Zone" The Planning Authority for the said land is Nagpur Metropolitan Region Development Authority. The Authority has passed Resolution No. 05/03/11/2025 to make the asforesaid modification;

Therefore, the part of said Development Plan showing the aforesaid modification are kept open at the office of the Nagpur Metropolitan Region Development Authority, Station Road, Sadar, Nagpur - 440 001 for inspection by public during office hours on all working days. This Notification shall also be available on this office website *www.nmrda.org.* The suggestions and objections which may be received to Nagpur Metropolitan Region Development Authority in respect of the said modification to the Development Plan within a period of one month from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* will be heard by the Nagpur Metropolitan Region Development Authority before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

SANJAY MEENA,
Metropolitan Commissioner,
Nagpur Metropolitan Region
Development Authority, Nagpur.

Nagpur :
Dated the 5th February, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.